

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड




www.surajyadigital.com | मंगळवार, दि. ६ सप्टेंबर २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३३८ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


# यह..तो...शुरुवात है, आगे इनकमिंग की बारात है

## लवकरच मेगा भरती, अनेक पक्षांना देणार धक्का : सावंत

सुराज्य/सोलापूर

**पक्षात इन्कमिंग म्हणजे काय असते हे १७ सप्टेंबरनंतर सोलापूरकरांना दिसेल. १७ सप्टेंबरनंतर अनेकजण शिवसेनेत (शिंदे गटात) प्रवेश करणार आहेत. अनेक पक्षांना धक्का देत लवकरच मेगा भरती होणार आहे. यह...तो...शुरुवात है, आगे बारात है... अशा आशयाचे विधान करत सार्वजनिक आरोग्यमंत्री डॉ.तानाजी सावंत यांनी येत्या काळात शिंदे गटामध्ये जंबो इनकमिंग होणार असल्याचे संकेत दिले.**

प्रियदर्शन साठे मित्रपरिवार आणि सहकार महर्षी गणपतराव साठे फाउंडेशनतर्फे हेरिटेज मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या विविध पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या शिवसेना (शिंदे गट) पक्षप्रवेश कार्यक्रमात सोमवारी रात्री ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शिवसेनेचे सोलापूर जिल्हा समन्वयक प्रा. शिवाजी सावंत, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, मनीष काळजे, शहरप्रमुख मनोज शेजवाल, संयोजक प्रियदर्शन साठे, मनोज साठे, आशिष परदेशी, दीपक पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी माजी नगरसेवक महादेव बिद्री, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे शहर उपाध्यक्ष विशाल कल्याणी, आशिष परदेशी, प्रविण बिराजदार, मोहसीन जमादार आदी विविध पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यांना भगवे उपरणे परिधान करून आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी त्यांचे स्वागत केले.




आरोग्यमंत्री डॉ. सावंत म्हणाले, ही फक्त सुरुवात आहे. आगामी काळात सोलापूर महापालिकेच्या निवडणुका आहेत. त्यावेळी मोठ्या प्रमाणावर शिवसेनेत इनकमिंग होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र विकासाच्या मार्गावर वेगाने पुढे जात आहे. २०२४ पर्यंत राज्य विकासात आघाडीवर नेण्याचा संकल्प शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाने केलेला आहे, असे डॉ. सावंत यांनी सांगितले.

### शिवसेना आमचीच

शिंदे गट वगैरे काहीही अस्तित्वात नाही. खरी शिवसेना आमचीच आहे. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेली हिंदुत्वाची विचारधारा पुढे नेण्याचे काम आम्ही करत आहोत, असेही मंत्री डॉ. सावंत यावेळी म्हणाले.

### धक्का कोणाला?

सप्टेंबर नंतर मेगा भरती होणार असल्याचे सावंत आणि जाहीर करतात एकनाथ शिंदे गटांमध्ये कोण प्रवेश करणार याबाबत चर्चा चालू आहे कुठल्या पक्षाला धक्का बसणार कुठल्या पक्षातील नेते मंडळी जाणार याबाबत याबाबतच्या चर्चेला उधाण आलय.

### मोहोळ येथे विरोधात घोषणाबाजी

मोहोळ येथे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पोलिसांनी तात्काळ त्यांना ताब्यात घेतले. मोहोळ येथे आरोग्य मंत्री तानाजी सावंत हे येण्यापूर्वी काही मिनिटे अगोदर शिवसैनिकांनी त्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पोलिसांनी तात्काळ त्यांना गरडा घातला व ताब्यात घेतले. तरी त्यांची घोषणाबाजी चालू होती. यामध्ये युवा सेनेचे जिल्हा प्रमुख महेश देशमुख, सचिन जाधव, हर्षल देशमुख, भूषण शिंदे, निलेष गायकवाड, गणेश गोडसे यांना तात्काळ ताब्यात घेवून काही वेळाने सोडून देण्यात आले.



**चौपाड येथे थोरला मंगळवेढा तालीम गणेश मंडळात सहभागी होऊन तानाजी सावंत यांनी लेझीवर ठेका धरला**

## पालिकेतर्फे ८४ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र

**सोलापूर :** शहर आणि परिसरात गणेश विसर्जन करण्यासाठी महापालिकेने विविध १२ ठिकाणी कृत्रिम कुंड तयार करण्याचे नियोजन केले आहे तर विविध ८४ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र करणार असल्याची माहिती आयुक्त पी शिवशंकर यांनी दिली.

सोलापूर शहरात कुवारी गणेशाचे विसर्जन होणार आहे, त्या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी पर्यावरण पूरक मूर्तीचे शक्यतो घरच्या घरीच विसर्जन करावे, असे आवाहन केले आहे. ज्यांना शक्य नाही अशांसाठी विविध ८४ ठिकाणी मूर्ती



संकलन केंद्र केल्याचे सांगितले. या ठिकाणी सर्व नागरिकांनी मूर्ती संकलित करावे तेथून महापालिकेच्या वतीने खाणीपर्यंत नेण्याची आणि विसर्जन करण्याची सोय करण्यात आली आहे. गतवेळी १०२ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र होते मात्र काही ठिकाणी कमी प्रतिसाद मिळाल्यामुळे त्याची संख्या आता ८४ करण्यात आल्याचेही आयुक्त म्हणाले. दरम्यान शहरात विविध १२ ठिकाणी कृत्रिम कुंड तयार करण्यात आले आहे. याची पाहणी आयुक्त पी.शवशंकर यांनी पोलीस आयुक्तांसोबत केली.

## अल्पवयीन मुलास पळवून नेऊन खून केल्याप्रकरणी आरोपीस जन्मठेप

सुराज्य/सोलापूर

अल्पवयीन मुलास पळवून नेऊन खून केल्याप्रकरणी आरोपी अरबाज आयुब शेख (रा.नान्नज तालुका उत्तर सोलापूर) यास जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.एन पांढरे यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

या घटनेची हकिकत अशी की, ११ जानेवारी २० रोजी आरोपी अरबाज याने मयत अमीर अल्ताफ मुजावर यांस घरी जाऊन त्यास घराबाहेर बोलावून घेतले.त्यानंतर आरोपीने दोन दारूच्या बाटल्या खरेदी करून त्यास शाळेच्या पाठीमागे झाडीत नेऊन दारू पाजली.त्यानंतर आरोपी व मयत अमीर या दोघांमध्ये वाद झाल्याने आरोपीने मयतास नान्नज ते मार्डी रोडवरील प्रशांत बिछडु यांच्या शेतात नेऊन रुमालाने गळा आवळून व डोक्यात दगड घालून खून केला.त्यानंतर आरोपीने मयताचे दोन्ही





मोबाईल स्वतःच्या घरी नेले.मयताच्या नातेवाईकांनी व आई-वडिलांनी नागरिकांनी त्याचा शोध घेतला असता, आरोपीवर संशय आल्याने त्याला तालुका पोलीस ठाण्यात नेले. तेथे त्याने गुन्ह्याची कबुली दिली. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकूण १९ साक्षीदार तपासण्यात आले.फिर्यादी अल्ताफ मुजावर व त्याची पत्नी आणि शुभम विटकर यांची साक्ष महत्त्वाची ठरली.सरकार पक्षाचा एक महत्त्वाचा साक्षीदार यात फुटला.मयताचा शवविच्छेदन अहवाल, डॉक्टरांची साक्ष, न्यायवैदिक प्रयोगशाळेचा अहवाल, घटनास्थळावरील सापडलेले पुरावे,पंचनामे यावरून आरोपीने मयत अमीर अल्ताफ मुजावर याचा खून केला असा युक्तिवाद जिल्हा सहकारी वकील प्रदीपसिंग रजपूत यांनी केला. हा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीस जन्मठेपेची शिक्षा, दोन हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास एक महिना साधा कारावास व मयताच्या वारसांना नुकसान भरपाई म्हणून ५० हजार रुपये आरोपीने द्यावेत.तसेच कलम ३६४ प्रमाणे दहा वर्ष शश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.

यात सरकार पक्षाच्या वतीने जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग रजपूत यांनी काम पाहिले.तर आरोपीच्या वतीने ॲड.अभिजित विटकर यांनी काम पाहिले.या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक सुहास जगताप व पोलीस उपनिरीक्षक अनिल देवडे यांनी केला. कोर्ट भैरवी म्हणून महिला पोलीस नाईक सुमन वाडे यांनी काम पाहिले.

## जे २०१९ मध्ये व्हायला हवं होतं, ते आम्ही आता केलं : मुख्यमंत्री शिंदे

**मुंबई :** 'आम्ही कोणासोबत युती केली आहे, २०१९ मध्ये ज्या निवडणुका झाल्या, त्यात बाळासाहेब आणि मोदी यांचे फोटो लावून आम्ही मतदारांसमोर गेलो. आम्ही चुकीचं काम केलं नाही. ज्या पक्षासोबत निवडणूक लढवली आणि जनतेचा देखील हाच कौल होता की, शिवसेना-भाजप युतीच सरकार आलं पाहिजे.



मात्र समीकरण बदललं, दुसरं सरकार आलं, ते आम्ही दुरुस्त केलं'', असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले आहेत. तत्पूर्वी बोलताना ते म्हणाले होते की, आज जनता खूश आहे. जे २०१९ मध्ये व्हायला हवं होतं, ते आम्ही आता केलं. २०१९ मध्ये जे झालं ते कोणालाच आवडलं नाही. ते म्हणाले, मतदारांनी युतीला कौल दिला होता. आता हे झाल्यानंतर मला खूप लोकांनी फोन करत अभिनंदन केलं. अनेक लोक मला म्हणाले, आम्ही युतीला मतदान केलं होतं. जनतेने युतीच्या बाजूने कौल दिला होता. त्यामुळे असे नवीन प्रयोग करताना आम्हाला विश्वासात घ्यायला हवं होतं. आमची मतं घेऊन आमच्याशी विश्वासघात झाला होता. त्यामुळे आज आम्ही खूप खूश आहोत, असे मला अनेक लोक म्हणाले.






## पंढरपुरात लवकरच होणार २०० खाटांचे रुग्णालय

**पंढरपूर :** पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालय हे सध्या १०० खाटांचे आहे. स्थानिक आमदार समाधान अवताडे यांच्या मागणीनुसार २०० खाटांचे सामान्य रुग्णालयात रूपांतर करून लवकरच कॅबिनेटच्या बैठकीत अंतिम मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देणार असल्याची माहिती आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी पंढरपूरमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

संपूर्ण देशाला मधुमेह या रोगाने ग्रासले आहे. यामुळे ज्या प्रमाणे पोलिओ हटाव मोहीम राबविण्यात आली, त्याच पद्धतीने महाराष्ट्रात मधुमेह हटाव ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची घोषणा पंढरपूर येथे आरोग्य मंत्री डॉ.तानाजी सावंत यांनी केली. सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असणाऱ्या डॉ.तानाजी सावंत यांनी पंढरीत विश्रामगृह येथे पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी प्रा.शिवाजी सावंत, महावीर देशमुख यांच्यासह शिंदे गटाच्या शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान



राज्यातील शासकिय रुग्णालय तसेच खासगी रुग्णालयातील सुविधा, मोठ्या प्रमाणात आकारली जाणारे बिल याबाबत अनेक तक्रारी आल्या आहेत. या सर्वांचा विचार करूनच राज्यातील सर्व शासकिय व खासगी रुग्णालयांची पाहणी करण्यासाठी पथकांची नियुक्ती करण्यात आली असून सदर पथक येथे अचानक भेट देऊन तपासणी करणार आहे. येत्या आठ दिवसात याचे काम सुरू होईल अशी माहिती डॉ. सावंत यांनी दिली. केंद्र व राज्य शासनाच्या योजना असतानाही अनेकदा खासगी रुग्णालयात अशा रुग्णांवर मोफत उपचार करण्याबाबत टाळाटाळ केली जाते. तसेच मोफत उपचार असतानाही बिल आकारले जात असल्याच्या तक्रारी आहेत. यासाठी आरोग्य विभागा अंतर्गत अशा रुग्णालयांवर कारवाई करण्याचे आदेश काढले असून येत्या आठ दिवसात याचे परिणाम दिसतील अशी ग्वाही त्यांनी दिली. राज्यात सध्या कोरोना, डेंग्यू, स्वाईन फ्लू आदी साथीचे रोग नियंत्रणात असून या रुग्णांची संख्या कमी होत असल्याचा दावा डॉ.सावंत यांनी केला.

पंढरपूर उपजिल्हा रुग्णालय २०० खाटांचे करण्याचा प्रस्ताव मागील सरकारच्या काळात दिला असेल तर येत्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यास मान्यता देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तर टाटा मेमोरियल पंढरीत रुग्णालय उभे करणार असले तर त्यांना जागा देणार असल्याचेही डॉ.सावंत यांनी सांगितले. युक्रेन मध्ये युध्द सुरू असल्याने तेथे वैद्यकिय शिक्षण घेणारे अनेक तरुण भारतात वापस आले आहेत. त्यांच्या पुढील शिक्षणा बाबत राज्य सरकार निर्णय घेऊ शकत नाही. यासाठी केंद्र सरकारने निर्णय घेतल्यास अशा विद्यार्थ्यांची जबाबदारी घेऊ अशी ग्वाही त्यांनी दिली. शिंदे गटाच्या सेनेची ताकद सोलापूर जिल्ह्यात असून जे आमच्या बरोबर नाहीत त्यांची काय ताकद आहे हे सर्वांनाच माहीत आहे असा टोला त्यांनी विरोधकांना लगावला.

> मागील सरकारच्या काळात पंढरपूर येथे स्थनिक आणि भाविकांच्या सोयीसाठी २०० खाटांचे सामान्य रुग्णालय करण्याची मागणी मी विधानसभेत केली होती. आता आमचे सरकार आल्यामुळे लवकरच २०० खटांचे सर्व सोयीयुक्त रुग्णालय करण्यासाठी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्याकडे पाठपुरावा करणार आहे.
>
> **- समाधान अवताडे**, आमदार पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघ

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बाप्पा या खड्डेमय रस्त्यांनी जावं लागेल! आशीर्वाद, शक्ती, समर्थ द्या

| कल्याण |
|---|
| ------------ |

| मेन बाजार |
|---|
| ------------ |